02 MAR 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पिकला मोती

## पहिला मोती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना भेट

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठामध्ये गोड्या पाण्यात मोती पिकविण्याचा प्रयोग अपेक्षेपलीकडे यशस्वी झाला असून, एका वर्षात मोती निर्माण करण्यात संशोधकांना यश आले आहे. विद्यापीठात पिकलेला पहिला मोती महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते भेट देण्यात आला.

विद्यापीठाच्या गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. नितीन कांबळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, '२८ फेब्रुवारी २०२४ ला कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्राणीशास्त्र अधिविभागाच्या परिसरात गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे उद्‌घाटन झाले. केंद्राने महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या मान्यतेने गोड्या पाण्यातील मोत्यांविषयी संशोधन व विकासाचे काम सुरू केले. प्रयोगशील उद्योजक दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शंभर प्राण्यांचे संगोपन करण्यास सुरुवात केली. त्यातील साधारण बारा महिन्यांचा पहिला मोती

पान ९ वर >



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मोती संशोधन केंद्रात पिकलेला पहिला मोती राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

### मोत्यांचा इतिहास आणि निर्मिती

■ हजारो वर्षांपासून वेगवेगळ्या देशांत मोती संगोपन, संशोधन व उत्पादन सुरू आहे. चीनमधील शांघाय प्रदेशात गोड्या पाण्यातील शिंपल्यांसह संवर्धित मोती तयार करण्याचे प्रयत्न यशस्वी झाले. चीनमध्ये दरवर्षी १५०० टनांपेक्षा जास्त मोती उत्पादन होते. मोती हे एक रत्न म्हणून ओळखले जाते. महत्त्वाचे म्हणजे नेक्रियस मोती प्रामुख्याने मोलस्कन बायव्हल्व्ह किंवा क्लॅमच्या दोन गटांद्वारे तयार केले जाते. सर्व कवचयुक्त मोलस्क नैसर्गिक प्रक्रियेद्वारे जेव्हा एखाद्या त्रासदायक सूक्ष्म वस्तूला सामोरे जातात, तेव्हा ते प्राण्यांच्या आवरणांच्या पटामध्ये अडकल्याने नेक्रियस थर स्त्रवतात. जिवंत प्राण्यांमध्ये मानवी हस्तक्षेपांशिवाय (नैसर्गिकरीत्या) किंवा हस्तक्षेप करून (कृत्रिमरीत्या) विविध क्षमतेचे चमकदार मोती तयार केले जातात.

# विद्यापीठात पिकला मोती

> पान १ वरून

कुलगुरूंच्या हस्ते राज्यपालांना भेट देण्यात आला. काही मोती शिंपले १८ महिन्यांपर्यंत ठेवण्यात येणार आहेत.'

ते पुढे म्हणाले, 'गतवर्षी पाण्यात संवर्धनासाठी सोडलेल्या १०० शिंपल्यांपैकी ८० शिंपले जगले. यांचा मृत्यू दर ४० टक्क्यांच्या घरात असतो. तो कमी करण्यात यश आले. पाण्याच्या टाकीमधील पाणी नदीप्रमाणे प्रवाही राखले. पाण्यातील ऑक्सिजनची पातळी सातत्याने कायम राखली. पाणी प्रदूषित होणार नाही, याची दक्षता घेत पाण्याचा दर्जा दररोज तपासून त्याचे गुणधर्म कायम राहतील, या दृष्टीने प्रयत्न केले. त्यांना आवश्यक त्या प्रमाणात अन्नपुरवठा केला. दर महिन्याला तीन प्राण्यांचे निरीक्षण केले आणि त्यांचे निष्कर्ष नोंदविले. प्राण्याचे वय, वजन, त्याची संवेदनक्षमता, गुणधर्मांचा अभ्यास केला. हवेतील दूषित घटक पाण्यात मिसळून त्याला कोणते विकार होणार नाहीत, याची काळजी घेतली. प्री-ऑपरेटिव्ह, ऑपरेटिव्ह आणि पोस्ट ऑपरेटिव्ह या टप्प्यांमधील सर्व प्रक्रिया जंतूसंसर्गविरहित पद्धतीने होतील, याची दक्षता घेतली. यामुळे ही प्रक्रिया ९९.०५ टक्के प्राण्यांनी स्वीकारली.'

### कमी भांडवलात उत्तम व्यवसायाची शक्यता

■ प्राणीशास्त्र विभागातील भाग-२ चे विद्यार्थी नवीन शैक्षणिक धोरणास अनुसरून ऑन जॉब ट्रेनिंग व कौशल्याधारित उपक्रम म्हणून मोती संवर्धन केंद्राच्या संशोधन व विकास कार्यात सहभाग नोंदवत आहेत. मोत्यांची योग्य प्रकारे शेती (लागवड) करून उत्तम आर्थिक नफा मिळू शकतो. केवळ जागा अगर कृत्रिम वा नैसर्गिक तलाव आणि प्राथमिक २५ ते ३० हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून १२ ते १८ महिन्यांच्या कालावधीत तीन ते चार लाखांचे उत्पन्न मिळू शकते.

02 MAR 2025 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात एका वर्षात मोती पिकला हो..!

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने गतवर्षी २८ फेब्रुवारी रोजी गोड्या पाण्यातील मोत्याच्या शेतीचा प्रयोग हाती घेतला. हा मोती पिकविण्याचा प्रयोग यशस्वी झाला असून, एका वर्षात मोती निर्माण करण्यात संशोधकांना यशही आले. विद्यापीठात पिकलेला पहिला मोती राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते भेट देण्यात आला.

प्राणिशास्त्र अधिविभागाच्या परिसरात गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्र उभारण्यात आले असून, गोड्या पाण्यातील मोत्यांविषयी संशोधन व विकासाचे काम सुरू केले. मोती या क्षेत्रातील यशस्वी प्रयोगशील उद्योजक दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शंभर प्राण्यांचे संगोपन करण्यास सुरुवात केली. योग्य देखभाल आणि संवर्धनामुळे या शिंपल्यांपासून चांगल्या प्रकारचे मोती साकार होऊ लागले आहेत. त्यातील साधारण बारा महिन्यांचा पहिला मोती तयार झाला. काही मोती शिंपले १८ महिन्यांपर्यंत ठेवण्यात येणार आहेत.



शिवाजी विद्यापीठामधील मोत्यांच्या शेतीत निर्माण झालेला पहिला मोती.

## मृत्युदर अवघा २० टक्के

मोती संशोधन केंद्राचे समन्वयक तथा प्राणिशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे म्हणाले, गतवर्षी पाण्यात संवर्धनासाठी सोडलेल्या १०० शिंपल्यांमधील मृत्युदर अवघा २० टक्के इतका आढळला.

**शंभरातील ८० शिंपले जगले. यांचा मृत्युदर हा ४० टक्क्यांच्या घरात असतो. तो कमी करण्यात आपल्याला यश आले. त्यासाठी आपण पाण्याच्या टाकीमधील पाणी नदीप्रमाणे प्रवाही राखले.**

## कमी खर्चात जास्त नफा

पारंपरिक शेतीला पर्याय तसेच जोडव्यवसाय म्हणून विद्यार्थी व शेतकरी या क्षेत्राची निवड करू शकतात. मोत्यांची योग्य प्रकारे शेती करून उत्तम आर्थिक नफा मिळू शकतो.

**योग्य प्रशिक्षण, कठोर नियोजन आणि उत्तम बीज यापासून चांगल्या प्रकारच्या मोत्यांचे उत्पादन मिळते. मोत्यांच्या लागवडीसाठी फारसे भांडवल लागत नाही.**

केवळ जागा अगर कृत्रिम वा नैसर्गिक तलाव आणि प्राथमिक २५ ते ३० हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून १२ ते १८ महिन्यांच्या कालावधीत ३ ते ४ लाखांचे उत्पन्न मिळू शकते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2025

तरुण भारत


# शिवाजी विद्यापीठात मोत्यांच्या शेतीला यश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गोड्या पाण्यातील मोत्यांच्या शेतीचा प्रयोग एक वर्षांपूर्वी सुरू केला. हा मोती पिकविण्याचा प्रयोग अपेक्षेपलिकडे यशस्वी झाला असून एका वर्षात मोती निर्माण करण्यात संशोधकांना यश आले आहे. विद्यापीठात पिकलेला पहिला मोती महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते भेट स्वरुपात देण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे समन्वयक तथा प्राणीशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे म्हणाले, कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्राणीशास्त्र अधिविभाग परिसरात गोड्या पाण्यातील मोती संशोधन केंद्राचे उद्घाटन केले. केंद्राने महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या मान्यतेने या ठिकाणी गोड्या पाण्यातील मोत्यांविषयी संशोधन व विकासाचे काम सुरू केले. मोती या क्षेत्रातील यशस्वी प्रयोगशील उद्योजक दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शंभर प्राण्यांचे संगोपन केले. योग्य देखभाल आणि संवर्धनामुळे या शिंपल्यांपासून चांगल्या प्रकारचे मोती साकार होऊ लागले आहेत. काही मोती शिंपले १८ महिन्यांपर्यंत ठेवण्यात येणार आहेत. पाण्यात संवर्धनासाठी सोडलेल्या १०० शिंपल्यांमधील मृत्यूदर २० टक्के इतका आढळला. म्हणजे शंभरातील ८० शिंपले जगले. सर्वसाधारणपणे यांचा मृत्यूदर हा ४० टक्क्यांच्या घरात असतो. तो कमी करण्यात यश आले. त्यासाठी पाण्याच्या टाकीमधील पाणी नदीप्रमाणे प्रवाही राखले. पाण्यातील ऑक्सिजनची पातळी सातत्याने कायम राखली. पाणी प्रदूषित होणार नाही, याची दक्षता घेत पाण्याचा दर्जा दररोज तपासून त्याचे गुणधर्म कायम राहतील, या दृष्टीने प्रयत्न केले. प्राण्यांची योग्य देखभाल करताना त्यांना आवश्यक त्या प्रमाणात अन्नपुरवठा केला. प्राण्याचे वय, वजन, त्याची संवेदनक्षमता आदी गुणधर्मांचाही अभ्यास केला. त्यांच्या प्रकृतीची योग्य काळजी घेतली. हवेतील दूषित घटक पाण्यात मिसळून त्याला कोणते विकार होणार नाहीत, याचीही काळजी घेतली. प्रि-ऑपरेटिव्ह, ऑपरेटिव्ह आणि पोस्ट ऑपरेटिव्ह या तिन्ही टप्प्यांमधील सर्व प्रक्रिया जंतूसंसर्गविरहित पद्धतीने होतील, याचीही दक्षता घेतली.

■ शिवाजी विद्यापीठातील पहिला मोती राज्यपालांना भेट



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मोत्यांच्या शेतीत निर्माण झालेला पहिला मोती.

### कमी भांडवलात उत्तम व्यवसायाच्या शक्यता

शिवाजी विद्यापीठातील सर्वच घटकांचे या उपक्रमात भरीव योगदान व कष्ट आहेत. नवीन शैक्षणिक धोरणास अनुसरुन ऑन जॉब ट्रेनिंग आणि कौशल्य आधारित उपक्रम म्हणून मोती संवर्धन केंद्राच्या संशोधन व विकास कार्यात सहभाग नोंदवत आहे. पारंपरिक शेतीला पर्याय तसेच जोडव्यवसाय म्हणून विद्यार्थी व शेतकरी या क्षेत्राची निवड करू शकतात. मोत्यांची योग्य प्रकारे शेती (लागवड) करून उत्तम आर्थिक नफा मिळू शकतो. योग्य प्रशिक्षण, कठोर नियोजन आणि उत्तम बीज यापासून चांगल्या प्रकारच्या मोत्यांचे उत्पादन मिळते. मोत्यांच्या लागवडीसाठी फारसे भांडवल लागत नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 MAR 2025

सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि अभिव्यक्ती कोल्हापूर यांच्यातर्फे मराठी भाषा गौरव दिनी 'भावगुज' हा अभिवाचनाचा कार्यक्रम झाला.

# 'भावगुज' मधून उलगडले मराठी भाषेचे सौंदर्य

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि अभिव्यक्ती कोल्हापूर यांच्यातर्फे मराठी भाषा गौरव दिनी 'भावगुज' हा अभिवाचनाचा कार्यक्रम झाला. त्यातून मराठी भाषेचे सौंदर्य उलगडले.

या कार्यक्रमात अंकुश कुलकर्णी, अजय वेदपाठक, हर्षवर्धन रणनवरे, अनाम देशपांडे आणि भानू देशपांडे हे कलाकार सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात काशी महाराजांच्या मंगलाचरणाने झाली. त्यानंतर शांता शेळके यांच्या एकपानी, तसेच हिमांशु स्मार्त यांच्या 'गंधाचे मौन' आणि 'अवडंबराच्या निचऱ्याचे प्रकरण' यांतील ललित गद्याचे अभिवाचन झाले. विंदा करंदीकर, आरती प्रभू, सुर्यकांत खोडेकर, वा.रा. कांत आणि अरुण कोल्हटकर यांच्या विविध कविता व गाणी सादर झाली. मराठी भाषेतील शब्दसौंदर्य, भाषेची गोडी, काळाच्या ओघात विस्मृतीत गेलेले शब्द, एखाद्या दृश्याचे कवीने-लेखकाने केलेले शब्दांतील वर्णन आणि भाषेद्वारे व्यक्त होणाऱ्या भाव-भावना यांचे मनोहारी वर्णन व चित्रण या अभिवाचनातून उलगडत गेले.

0 2 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कायदा क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा सकारात्मक वापर शक्य : डॉ. बंगाली

## विद्यापीठात दोनदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर, ता. १ : 'कृत्रिम बुद्धिमत्तेचा कायद्याच्या क्षेत्रात सकारात्मक वापर करून घेता येणे शक्य आहे', असे प्रतिपादन कायदेतज्ज्ञ डॉ. स्वप्नील बंगाली यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागात पीएम- उषा योजनेंतर्गत 'व्हॅल्यू ॲडेड कोर्स ऑन ज्युडिशियल एक्झामिनेशन ट्रेनिंग' विषयावर दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे अध्यक्षस्थानी होते. विभागात कार्यशाळेचे आयोजन केले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागातर्फे आयोजित दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. स्वप्नील बंगाली.

डॉ. बंगाली म्हणाले, 'सर्व क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिरकाव झाला आहे. न्यायदानाची प्रक्रिया गतिमान करण्याच्या दृष्टीने न्यायपालिका नव तंत्रज्ञानाबाबत अत्यंत गंभीर व सकारात्मक आहे.' दुसऱ्या सत्रात सांगलीतील ॲड. संदीप मुतालिक यांनी कामगार न्यायालयाशी संबंधित कायद्यांची सविस्तर माहिती दिली. तिसऱ्या सत्रात डॉ. बंगाली यांनी 'इंटरनेट ऑफ थिंग्स' विषयावर मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रातही त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व शंकांना उत्तरे दिली. यावेळी डॉ. आर. नारायणा, सुवर्णा कांबळे, अक्षय कोल्हापुरे, आकाश कुंभार, पूजा लोहार, वैष्णवी माळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2025
तरुण भारत

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश कायद्याच्या उपयोजनात शक्य

■ कायदेतज्ज्ञ डॉ. स्वप्नील बंगाली यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

कायद्याच्या उपयोजनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा समावेश शक्य आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ डॉ. स्वप्नील बंगाली यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभामध्ये पीएम–उषा योजनेअंतर्गत 'व्हॅल्यू ॲडेड कोर्स ऑन ज्युडिशियल एक्झामिनेशन ट्रेनिंग' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे होते.

डॉ. बंगाली म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानाने आज सर्व क्षेत्रे व्यापली आहेत. या तंत्रज्ञानाचा कायद्याच्या क्षेत्रातही अत्यंत सकारात्मक वापर करून घेता येणे शक्य आहे. न्यायदानाची प्रक्रिया गतिमान होण्याच्या दृष्टीने. न्यायपालिका नवतंत्रज्ञानाबाबत अत्यंत गंभीर आणि सकारात्मक असल्याचेही त्यांनी सांगितले. दुसऱ्या



शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात बोलताना डॉ. स्वप्नील बंगाली.

सत्रात ॲड. संदीप मुतालिक (सांगली) यांनी कामगार न्यायालयाशी संबंधित कायद्यांची सविस्तर माहिती दिली. तिसऱ्या सत्रात डॉ. बंगाली यांनी 'इंटरनेट ऑफ थिंग्स' या विषयावरही मार्गदर्शन केले. चौथ्या सत्रातही त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेविषयी सविस्तर मार्गदर्शन आणि शंकांचे निरसन केले. यावेळी डॉ. आर. नारायणा, सुवर्णा कांबळे, अक्षय कोल्हापुरे, आकाश कुंभार, पूजा लोहार आदी उपस्थित होते.

02 MAR 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉ. दत्ता देशमुख महाराष्ट्राचे लोकशिक्षक

## प्रा. राजू पांडेः शिवाजी विद्यापीठात अध्यासनातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. १ : 'कॉ. दत्ता देशमुख महाराष्ट्राचे लोकशिक्षक होते. त्यांनी शेतकरी व कामगार वर्गात जाणीव जागृती करून तत्त्वनिष्ठ राजकारण केले', असे प्रतिपादन प्रा. राजू पांडे यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठातील कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन व राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'दत्ता देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. दत्ता देशमुख पुरोगामी विचार मंचचे सचिव बाबूराव तारळी अध्यक्षस्थानी होते.

प्रा. पांडे म्हणाले, 'शेतकरी, शेतमजूर, कामगारांचे प्रश्न लक्षात घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न देशमुख यांनी केला. ग्रामीण व शहरी भागातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांचे त्यांनी संघटन केले. तसेच शेतकरी व कामगार वर्गात जाणीव जागृती केली. त्यांनी तत्त्वनिष्ठ राजकारण केले. आज मात्र महाराष्ट्रात संधिसाधू व तडजोडीचे राजकारण केले जात आहे. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांना कॉंग्रेसमध्ये सामील होण्याची विनंती केली होती, मात्र



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना प्रा. राजू पांडे.

कॉंग्रेसमध्ये सत्ता, पद, प्रतिष्ठा मिळेल, परंतु शेतमजूर, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्यासाठी कॉंग्रेसमध्ये आल्यानंतर काम करता येण्याची शाश्वती नाही, असे म्हणत त्यांनी चव्हाण यांच्या विनंतीला नकार दिला होता.'

ते पुढे म्हणाले, 'आधुनिक महाराष्ट्राचे ते शिल्पकार होते. त्यांनी रचनात्मक व विधायक काम करताना शेती, पाणी, दुष्काळग्रस्त, विस्थापित, धरणग्रस्त, पर्यावरण व लोकसंख्या नियंत्रण अशा विविध घटकांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आवाज उठवला होता.'

तारळी म्हणाले, 'एखाद्या संस्थेत काम करताना तिथे एक रुपयाचा फायदा झाला तर फक्त पंचवीस पैसे घेण्याचा नैतिक अधिकार असतो. ज्या संस्थेत काम करतो, ती जिवंत ठेवली पाहिजे, असे देशमुख यांचे म्हणणे होते. सध्याच्या पिढीने पुरोगामी विचारांची जपणूक करताना विस्कटलेल्या महाराष्ट्राची घडी बसवावी.'

याप्रसंगी राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे उपस्थित होते. डॉ. नेहा वाडेकर यांनी प्रास्ताविक केले. अक्षय जहागीरदार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 MAR 2025

लोकमत

# दत्ता देशमुख हे महाराष्ट्राचे लोकशिक्षक : राजू पांडे

**कोल्हापूर :** कॉ. दत्ता देशमुख यांनी



ग्रामीण व शहरी भागातील संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांचे संघटन केले. खऱ्या अर्थाने ते महाराष्ट्राचे लोकशिक्षक होते, असे प्रतिपादन प्रा. राजू पांडे यांनी शुक्रवारी केले. शिवाजी विद्यापीठाचे कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या वतीने आयोजित 'कॉ. दत्ता देशमुख : व्यक्ती, विचार आणि कार्य' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. बाबूराव तारळी अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. प्रकाश पवार, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे उपस्थित होते. डॉ. नेहा वाडेकर यांनी प्रास्ताविक केले. अक्षय जहागीरदार यांनी आभार मानले.